**विषय:-भिवंडी महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उप अभियंता (स्थापत्य/पाणीपुरवठा) (वर्ग-१) या पदावरील तात्पुरत्या पदोन्नती करीता विभागीय पदोन्नती समितीने शिफारस केलेल्या निवडसूचीस प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्तावना**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उप अभियंता (स्थापत्य /पाणीपुरवठा) (वर्ग-१) या संवर्गातील रिक्त पदे तात्पुरत्या पदोन्नतीने प्रचलित शासन निर्णयान्वये भरणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ (१) अन्वये महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदोन्नतीने भरावयाच्या उप अभियंता (स्थापत्य /पाणीपुरवठा) (वर्ग-१) संवर्गातील रिक्त पदांवर पदोन्नती देण्यासाठी पात्र कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/पाणीपुरवठा) यांची निवडसूची तयार करणेकामी गठीत विभागीय पदोन्नती समितीची बैठक दि. १९/१२/२०२४ रोजी सायं. ५.३० वाजता मा. प्रशासक तथा आयुक्त सो यांचे दालनात संपन्न झालेली आहे. सदर विभागीय पदोन्नती समितीचे बैठकीत उपरोक्त पदावरील खालिलप्रमाणे निवडसूचीस पदोन्नती समितीने शिफारस केलेली आहे.

| **अ.क्र.** | **अधिकाऱ्याचे नाव** | **सेवा जेष्ठता यादीतील क्रमांक** |
|---|---|---|
| **कनिष्ठ अभियंता (स्थापत्य / पाणीपुरवठा)** | | |
| १ | श्री. विनोद मारुती मते | ६ |

त्यानुसार भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/पाणीपुरवठा) या संवर्गातील निव्वल तात्पुरत्या स्वरुपात शासन निर्णय क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि.०७/०५/२०२१ अन्वये विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ मधील मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयास अधिन राहून पदोन्नती देण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अभियंत्याचे नाव | सध्याचे पद | सध्याचे वेतन बँड | पदोन्नतीचे पद | पदोन्नतीचे वेतन बँड | अभियंत्याचा जातीचा प्रवर्ग | पदोन्नतीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| **(स्थापत्य / पाणीपुरवठा)** | | | | | | | |
| १ | विनोद मारुती मते | कनिष्ठ अभियंता | S-२० (५६१००-१७७५००) | उप अभियंता | S-२० (५६१००-१७७५००) | इमाव | खुला |

तरी उपरोक्त निवडसूचीस प्रशासक म्हणून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३(१), ५३(२) व ५३ (३) अन्वये मंजुरी मिळणेकामी तसेच भिवंडी निजामपूर शहर महानगरपलिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गिकरण), नियम २०२२ शासन निर्णय क्र. भिनिम- २०२२/ प्र.क्र.९४/नवि-२३, दि. १४ डिसेंबर २०२२ चे परिशिष्ट-१, परिच्छेद -६ अन्वये शासन मंजुरी करीता प्रस्ताव सादर करण्यास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**प्रशासकीय ठराव क्रमांक** ७२८ **दिनांक** २८/०७/२०२५.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उप अभियंता (स्थापत्य /पाणीपुरवठा) (वर्ग-१) या संवर्गातील रिक्त पदे तात्पुरत्या पदोन्नतीने प्रचलित शासन निर्णयान्वये भरणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ (१) अन्वये महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदोन्नतीने भरावयाच्या उप अभियंता (स्थापत्य /पाणीपुरवठा) (वर्ग-१) संवर्गातील रिक्त पदांवर पदोन्नती देण्यासाठी पात्र कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/पाणीपुरवठा) यांची निवडसूचीस सद्यस्थितीत मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र शासन आदेश क्र. एमसीओ २०२०/प्र.क्र. ७१ (भाग-१) नवी-१४, दि.०६/०६/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२अ (१) तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य प्रशासक तथा आयुक्त भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम कलम ५३(१), ५३(२) व ५३ (३) अन्वये मंजुरी देत असून भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण), नियम २०२२ शासन निर्णय क्र. भिनिम-२०२२/ प्र.क्र.९४/नवि-२३, दि. १४ डिसेंबर २०२२ चे परिशिष्ट-१, परिच्छेद -६ अन्वये शासन मंजुरी करीता प्रस्ताव सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**